नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १३६ | Issue - 136 | वार - रविवार दि. ११ ऑक्टोबर २०२६ | Blow- Sunday Date 11 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दिल्लीसह देशभरात ज्ञानेश कुमारांविरोधात आंदोलन

## दिल्लीत लॉकडाऊन; तब्बल ३८ हजार सशस्त्र पोलिसांच्या फौजाच फौजा, तरीही सीजेपी, जेनझी, वकिल, विद्यार्थी संघटना आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांनी सीजेपीचे चलो जंतर मंतर आंदोलन मोडित काढण्याचा चंग बांधूनही दिल्लीत अभूतपूर्व प्रतिसाद आंदोलनाला मिळाला. शेतकरी आंदोलनाच्या धर्तीवर दिल्ली पोलिसांनी आंदोलन चिरडण्यासाठी बळाचा वापर करत तब्बल ४ जणांना ताब्यात घेत डांबून ठेवलं आहे. यामध्ये सीजेपी संस्थापक अभिजित दिपके, माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पिनारायी विजयन, अरविंद केजरीवाल, ध्रुव राठी, नेहा बोरा, योगेंद्र यादव यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेत छावण्यांमध्ये रवानगी केली. तब्बल ४ हजार जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. त्यामुळे सीजेपी आंदोलक सायंकाळी ६ वाजेपर्यंत जंतर मंतरवर पोहोचू शकले नाहीत. पोलिसांनी दिल्ली विमानतळावर सीजेपी नेतृत्वातील सदस्य



अभिजीत दीपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना ताब्यात घेतले होते. दिपके यांनी आंदोलनाची धुरा अजिंक्य शिंदे यांच्या खांद्यावर दिली असून गेल्या आठ तासांपासून संपर्क नसल्याचे त्यांनी म्हटलं आहे.

दिल्ली पोलिसांच्या अभूतपूर्व नाकेबंदीनंतरही दिल्लीसह देशभरात ज्ञानेशकुमारांविरोधात वणवा पेटल्याचे चित्र दिसून आले. आंदोलनात जेन झी, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, वकील संघटनांचा सहभाग दिसून आले. मुंबई, पुणे, नाशिकमध्येही नागरिक रस्त्यावर उतरल्याचे दिसून आलं. त्यामुळे जंतरमंतरवर आंदोलकांना पोहोचता आलं नसलं, तरी जिथं पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत्न केला तिथंच जंतरमंतर झाल्याचे दिसून आले. दुसरीकडे, सीजेपीने सकाळी १० वाजता जंतर मंतरवर आंदोलनाचे आवाहन केले होते. समर्थकांनी तिथे पोहोचण्याचा प्रयत्न केला, परंतु अनेक ठिकाणी लावलेल्या तीन ते पाच थरांच्या बॅरिकेड्समुळे त्यांना पुढे जाण्यापासून रोखण्यात आले.

पोलिसांशी झालेल्या संघर्षाच्या एक-दोन घटना घडल्या. आंदोलकांनी आकाशवाणी भवनजवळ बॅरिकेड्स तोडले आणि दगडफेक केली, ज्यात दोन पोलीस जखमी झाले. मतदार यादी आणि एसआयआरमधील अनियमिततेचा निषेध करण्यासाठी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी सीजेपीने जंतर मंतरवर आंदोलनाचे आवाहन केले होते.

८ ते १२ ऑक्टोबर दरम्यान, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या २२१ कंपन्या, म्हणजेच अंदाजे २३ हजार जवान तैनात करण्यात आले होते. याव्यतिरिक्त, किमान १५ हजार दिल्ली पोलीस कर्मचारी तैनात करण्याचे नियोजन होते. दिल्लीला जाणाऱ्या रेल्वेगाड्या २५० रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या. वाहने कोण भाड्याने घेत आहे आणि दिल्लीत किती लोक येत आहेत, हे निश्चित करण्यासाठी बस बुकिंगची तपासणी सुरू करण्यात आली.

विद्यापीठ आणि महाविद्यालय प्रमुख तसेच पीजी मालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांना आंदोलनात सहभागी होण्यापासून रोखण्याचे आवाहन करण्यात आले.

४५ मेट्रो स्थानकांवरील प्रवेश आणि बाहेर पडण्याचे मार्ग बंद करण्याची व्यवस्था करण्यात आली. जंतर मंतरसमोर१० फूट उंचीचे बॅरिकेड्स उभारण्यात आले. अश्रु-धूर वाहनेही तैनात करण्यात आली होती.

इतर राज्यांतून येणाऱ्या मार्गांवर तपासणी वाढवण्यात आली. राजस्थानहून येणाऱ्या मार्गांवर, तसेच उत्तर प्रदेशच्या पूर्व दिल्ली आणि शाहदरा सीमांवरही पाळत ठेवण्यात आली. खिळे आणि बॅरिकेड्स लावण्यात आले.

संघर्षांचे रेकॉर्डिंग करण्यासाठी आघाडीवर तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना १५० बॉडीकॅम देण्यात आले. आंदोलकांना ठेवण्यासाठी स्टेडियममध्ये तात्पुरत्या छावण्या उभारण्यात आल्या.

# दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' अभियानाला गती द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तसेच जलसाठ्यांची क्षमता वाढविणे आणि शेतीची उत्पादकता सुधारण्याच्या दृष्टीने 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेच्या कामांना गती देण्यावर भर देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत पुढील आठ महिने जोमाने काम करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आणि मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांनी संबंधित विभागांच्या अधिकारी व स्वयंसेवी संस्थांना दिले.

> **पुढील आठ महिने धरणांमधील सुपीक गाळ काढून शेतजमिनींची सुपीकता वाढविण्यावर भर**

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली आणि मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक झाली. या बैठकीत योजनेअंतर्गत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना येणाऱ्या अडचणी, काम काजातील विविध प्रश्न तसेच योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि संस्थांनी मांडलेल्या सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यातील जलसाठ्यांमधील गाळ काढून त्याचा शेतजमिनींसाठी उपयोग केल्यास धरणांची जलसाठवण क्षमता वाढण्यास मदत होण्याबरोबरच शेतजमिनींची सुपीकताही वाढू शकते. या दृष्टीने जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील धरणांमधून सुपीक गाळ काढून तो शेतकऱ्यांच्या शेतात पसरविण्याच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

योजनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संबंधित विभागांचे अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने काम करावे. कामकाजात येणाऱ्या अडचणी दूर करून उपलब्ध कालावधीचा प्रभावी उपयोग करावा, असेही यावेळी सूचित करण्यात आले. जलसाठ्यांचे संवर्धन, पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि शेतजमिनींची सुपीकता सुधारण्याच्या दृष्टीने 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना महत्त्वपूर्ण ठरणार असून, आगामी आठ महिन्यांत या योजनेतील कामांची गती वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे, जेणेकरून पुढील वर्षी पाणीसाठा उपलब्ध होईल.

# काँग्रेसकडून सर्व आमदार, खासदारांसाठी आदेश सुटले; इंडिया आघाडीकडून सरकारविरोधात आंदोलन उभारण्याची तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू असताना दुसरीकडे काँग्रेस च्या गोटात हालचालींना वेग आला आहे. सरकारविरोधात मोठं आंदोलन उभारण्याची तयारी इंडिया आघाडीनं सुरू केली आहे. काँग्रेस हायकमांडकडून सर्व आमदार , खासदारांना दिल्लीत उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी काँग्रेसनं लावून धरली आहे. यासाठी गेले तीन दिवस काँग्रेसनं दिल्लीत आंदोलनं केली. लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी आंदोलनांचं नेतृत्त्व केलं. दिल्ली पोलिसांनी दोन-वेळा त्यांना ताब्यात घेतलं. राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीच्या १० नेत्यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करण्याची मागणी इंडिया आघाडीनं राष्ट्रपतींकडे केली.



सलग तीन दिवस दिल्लीत आंदोलनं केल्यानंतर आता सोमवारी म्हणजेच १२ ऑक्टोबरला पुन्हा एकदा प्रचंड आंदोलन उभारण्याची तयारी काँग्रेसनं सुरू केली आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनं पक्षाच्या सगळ्या आमदार, खासदारांना १२ ऑक्टोबरला दिल्लीत उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या आहेत. सध्याच्या घडीला देशात काँग्रेसचे १२८ खासदार आणि सव्वा सातशेच्या वर आमदार आहेत. या सगळ्यांना उद्या रात्रीपर्यंत दिल्ली गाठण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. सर्व प्रदेशाध्यक्ष आणि महत्त्वाच्या नेत्यांनादेखील दिल्लीत पोहोचण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मतदार याद्यांमधील घोळ, एसआयआर प्रक्रिया यावरून विरोधक केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आग्रही आहेत. सर्वोच्च न्यायालयाकडे कूच करण्याची तयारी इंडिया आघाडीनं सुरू केली आहे. या आंदोलनात इंडिया आघाडीतील सर्वच्या सर्व पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी सहभाग घ्यावा, यासाठी काँग्रेस प्रयत्नशील आहे.

गेले तीन दिवस दिल्लीत इंडिया आघाडीचं आंदोलन सुरू होतं. इंडिया आघाडीनं मुख्य निवडणूक आयुक्तांच्या भेटीची मागणी केली. त्यासाठी निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला. पण मुख्य निवडणूक आयुक्त विरोधी पक्षाच्या नेत्यांना भेटलेले नाहीत. यानंतर आज कॉकरोच जनता पार्टीनं मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणीसाठी जंतरमंतरवर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी आधीच आंदोलकांची धरपकड केली. सीजेपीचे संयोजक अभिजीत दिपके, सहसंयोजक आशुतोष रांका, सौरव दास यांना दिल्लीत पोहोचताच ताब्यात घेण्यात आलं. तर ५०० हून अधिक आंदोलकांदेखील ताब्यात घेण्यात आलं.

**संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना**

# महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब अडवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.



जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारण्याबरोबरच कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित संनियंत्रण प्रणाली विकसित करावी.

विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. या बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ए.टी.ई. चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा, पानी फाउंडेशनचे सत्यजित भटकळ, अभिनेते आमिर खान, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# पिसे आश्रमशाळेतील विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी मुख्याध्यापक, अधीक्षक व वर्गशिक्षकावर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव**

ठाणे जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा, पिसे येथील विद्यार्थी विवेक सुभाष भोये या ११ वर्षीय विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी संबंधित वैद्यकीय अधिकारी, मुख्याध्यापक, अधीक्षक व दुर्लक्ष करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करावा म्हणून श्रमजीवी संघटनेकडून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर येथे शुक्रवारी दुपारपासून आंदोलन सुरू केले होते. अखेर रात्री आठ वाजता त्यांच्या आंदोलनाला यश आले असून, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, अधीक्षक व वर्गशिक्षक यांच्यावर शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे की, शहापूर तालुक्यातील खर्डीजवळील वंगणपाडा येथील रहिवासी योगिता सुभाष भोये यांचा मोठा मुलगा विवेक सुभाष भोये, वय वर्षे ११, हा भिवंडी तालुक्यातील भादाणे रोड, पडघा जवळील शासकीय आश्रमशाळा, पिसे येथे शिक्षण घेत होता. शुक्रवारी सकाळी ७ वाजता आश्रमशाळेचे अधीक्षक राहुल जवंजाळ यांचा योगिता सुभाष भोये यांना फोन आला की, तुमचा मुलगा विवेक हा चार दिवसांपासून आजारी आहे. त्याला ताप येत आहे. आम्ही त्याला उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे घेऊन जात आहोत. तुम्ही सकाळी ९.३० पर्यंत रुग्णालयात या, असे सांगितले. तेव्हा लागलीच योगिता सुभाष भोये व तिचा भाऊ गोपाळ काशिनाथ इंदल हे शासकीय आश्रमशाळा, पिसे येथे गेले. त्यांनी विवेकला पाहिले असता, त्यांचा मुलगा विवेक धापा टाकत होता. तेव्हा मुख्याध्यापक जयवंत सापळे, अधीक्षक राहुल जवंजाळ आणि वर्गशिक्षक अशोक साळवे यांना योगिता सुभाष भोये यांनी विचारणा केली की, माझा मुलगा चार दिवसांपासून आजारी आहे, मला का कळवले नाही? दरम्यान, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व अधीक्षक यांनी विवेकवर ६ ऑक्टोबर रोजी व ८ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, पडघा येथे उपचार केले. परंतु गुरुवारी ८ ऑक्टोबर रोजी विवेकची तब्येत जास्त बिघडल्यामुळे पडघा येथील डॉक्टरांनी विवेकला भिवंडी येथील इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालयात दाखल करण्यास सांगितले होते. मात्र, शाळेच्या जबाबदार व्यक्तींनी विवेकला रुग्णालयात दाखल केले नाही आणि पालकांनादेखील आधी न कळवता, शेवटच्या क्षणी तब्येत जास्त बिघडल्यावर शुक्रवारी सकाळी ७ वाजता कळविले.

आश्रमशाळेत विवेकची आई योगिता सुभाष भोये हिने, तुमच्या हलगर्जीपणामुळे व निष्काळजीपणामुळे माझ्या मुलाची तब्येत जास्त खराब झाली आहे, अशी बडबड केली असता, मुख्याध्यापक सापळे योगिताला म्हणाले की, तू मुलाला घरी घेऊन जाऊन काय करणार आहेस? त्याच्या औषधोपचाराची जबाबदारी आमची आहे, असे म्हणाले. त्यानंतर सापळे यांनी रिक्षा बोलावली. रिक्षामध्ये विवेकची आई योगिता, मुख्याध्यापक जयवंत सापळे, अधीक्षक राहुल जवंजाळ व वर्गशिक्षक अशोक साळवे हे विवेकला घेऊन सकाळी १०.१५ वाजता उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे दाखल झाले असता, डॉक्टरांनी विवेकवर उपचार सुरू केले. त्यावेळी आश्रमशाळेच्या शिक्षक-अधिकाऱ्यांनी विवेकची आई व नातेवाईकांना बाहेर बसण्यासाठी सांगितले. त्यामुळे ते सर्व बाहेर बसले.

दरम्यान, शाळेचे मुख्याध्यापक, अधीक्षक व शिक्षक हे दवाखान्यात आतमध्ये होते. उपचारादरम्यान विवेकचा मृत्यू झाल्याचे या तिघांना समजताच त्यांनी विवेकची आई योगिता सुभाष भोये व नातेवाईक यांना विवेक मयत झाल्याचे न सांगताच तेथून पळून गेले. थोड्या वेळाने योगिता व नातेवाईकांनी डॉक्टरांकडे विवेकच्या तब्येतीची चौकशी केली असता, कर्तव्यावर असणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले की, विवेकचा मृत्यू हा १०.४५ मिनिटांनीच झाला आहे.

मयत विवेकची आई योगिता सुभाष भोये यांच्या फिर्यादीनुसार, विवेकच्या आरोग्याची सर्व जबाबदारी शासकीय आश्रमशाळा, पिसे येथील मुख्याध्यापक जयवंत सापळे, अधीक्षक राहुल जवंजाळ आणि वर्गशिक्षक अशोक साळवे यांची असताना त्यांनी वेळेवर योग्य उपचार केले नाहीत. निष्काळजीपणा केल्यामुळे विवेकचा मृत्यू झाला म्हणून शासकीय आश्रमशाळा, पिसे येथील प्रभारी प्राथमिक मुख्याध्यापक जयवंत भाऊ सापळे, अधीक्षक राहुल गजानन जवंजाळ व वर्गशिक्षक अशोक प्रभू साळवे यांच्यावर शहापूर पोलीस ठाण्यात शुक्रवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८ वाजता बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ नुसार कलम ७५, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १०६(१), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची अधिकृत माहिती शहापूर पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.




दरम्यान, शुक्रवारी दुपारीच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूरचे प्रकल्प अधिकारी टी. आर. गलांडे यांनी आदिवासी विकास ठाणे अपर आयुक्त यांच्या मंजुरी आदेशानुसार शासकीय आश्रमशाळा, पिसे, तालुका भिवंडी येथील निवासी विद्यार्थी कुमार विवेक सुभाष भोये, इयत्ता ५ वी, याचा उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला म्हणून सरनामा क्रमांक २ नुसार मृत्यूस जबाबदार असलेले प्रभारी प्राथमिक मुख्याध्यापक जयवंत भाऊ सापळे, अधीक्षक राहुल गजानन जवंजाळ व प्राथमिक शिक्षक अशोक प्रभू साळवे यांना ९ ऑक्टोबर २०२६ पासून निलंबित केले आहे.

## महाराष्ट्र वीज कामगार महासंघाकडून दुष्काळग्रस्त बळीराजासाठी 'मुख्यमंत्री सहायता निधी'स ५ लाख रुपयांची मदत जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी/धाराशिव : महाराष्ट्रात यावर्षी पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. हाताशी आलेली पिके वाळल्याने आणि पिण्याच्या पाण्याची व चाराची तीव्र टंचाई निर्माण झाल्यामुळे राज्यातील शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडला आहे. या बिकट परिस्थितीत दुष्काळग्रस्त बळीराजाला मदतीचा हात देण्यासाठी महाराष्ट्र वीज कामगार महासंघ (इचड) पुढे आला असून, संघटनेच्या वतीने 'मुख्यमंत्री सहायता निधी'स रु. ५ लाख (पाच लाख रुपये) देणगी जाहीर करण्यात आली आहे.

या संदर्भात महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे अध्यक्ष श्री. विठ्ठल भालेराव, महामंत्री श्री. अरुण पिवळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना पत्र पाठवून या मदतीची घोषणा केली आहे.

पत्रात नमूद केल्यानुसार, भारतीय मजदूर संघाची (इचड) संलग्न संघटना असलेला महाराष्ट्र वीज कामगार महासंघ केवळ कामगारांच्या प्रश्नांसाठीच नव्हे, तर 'राष्ट्र प्रथम' आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या विचाराने प्रेरित होऊन कार्यरत आहे. मागील वर्षी राज्यात निर्माण झालेल्या गंभीर पूरपरिस्थितीतही संघटनेने ५ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री सहायता निधीस दिली होती. तसेच कोरोना असो किंवा इतर कोणतीही आपत्ती, महासंघाने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत शासनाला व जनतेला सहकार्य केले आहे. त्याच परंपरेला जागून यावर्षीच्या भीषण दुष्काळी परिस्थितीत शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा व शासनाच्या पुनर्वसन कार्यात खारीचा वाटा उचलला जावा, म्हणून ही ५ लाख रुपयांची मदत पुनश्च जाहीर करण्यात आली आहे. या कठीण प्रसंगी सरकार आणि समाज यांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज असल्याचे मत महासंघाने व्यक्त केले आहे.

## आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ता व कलाकार सिद्धांत सोनू बनसोडे काळाच्या पडद्याआड

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदूर्ग शहरातील फुले , शाहू , आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ता व हाडाचा कलाकार सिद्धांत सोनू बाबासाहेब बनसोडे काळाच्या पडदयाआड गेला आहे

बसस्थानका कडून भिमनगर कडे घरी येत आसताता आचानक हायवे रोडवर किंचाळण्याचा आवाज आल्याने भिमनगर मधील तरुणानी हायवेकडे धाव होतले तरुणाना सोनू जमीनीवर कोसळल्याला दिसला त्याला किरकोळ दुःखापत झाली परंतू आचानक त्याच वेळेस हृदयविकाराच्या तीव्र झटका आल्याने त्यांना तत्काळ उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले त्यावेळी डॉक्टरानी मयत घोषित केले



आंबेडकरी चळवळ जिवंत ठेवण्यासाठी ते सतत प्रयत्न करीत आसत रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांचा मोठा मुलगा होता बौद्धाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे यांचा पुतण्या होता नळदुर्ग शहरातील निर्भिड व सृजनशिल विश्वासू व्यक्तीमत्व हारपलं आसल्याने बनसोडे कुटुंबावर नळदुर्ग शहरावर शोककळा पसरली होती त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे .

## संजय सोनवणे यांची 'छबूशेठ'च्या भूमिकेतून धमाकेदार एन्ट्री; सुनील गोडबोले यांच्या हस्ते सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी /बाळासाहेब अहिरे

नाशिक : खान्देश टॉकीज प्रस्तुत आणि दिव्यश्री प्रोडक्शन निर्मित 'अमीर की तिसरी शादी सलमान कुंवारा' या खान्देशी वेब सिरीजचा शुभारंभ नाशिक येथील ग्रेप काउंटी इको रिसॉर्ट, त्र्यंबकेश्वर रोड येथे उत्साहात पार पडला. या वेब सिरीजमध्ये खान्देशचे अष्टपैलू अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक संजय सोनवणे 'छबूशेठ' ही महत्त्वपूर्ण विनोदी भूमिका साकारत आहेत. यावेळी ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले यांच्या हस्ते संजय सोनवणे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. निर्माते-दिग्दर्शक गिरीश सोनी, आनंद बच्छाव, दीपक शिवदे, मोहसीन मुस्कान, अरबाज मुस्कान यांच्यासह लेखक, तंत्रज्ञ आणि अनेक कलाकार उपस्थित होते. या वेब सिरीजमुळे नाशिक आणि खान्देशमधील कलाकारांना मनोरंजन क्षेत्रात नवे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

## नवरात्रोत्सवाच्या अध्यक्षपदी मुस्लिम तरुण; कडबगावात एकतेचा जागर!

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी



धर्माच्या भिंती ओलांडून माणुसकीचे नाते जपणारा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा निर्णय अक्कलकोट स्टेशन परिसरातील कडबगाव येथे पाहायला मिळाला आहे. श्री मध्यवर्ती नवरात्र तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी मुस्लिम समाजातील अयुब शेख यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवाच्या नेतृत्वाची

**अयुब शेख यांची एकमताने निवड; धार्मिक सलोख्याचा आदर्श संदेश**

जबाबदारी मुस्लिम तरुणाकडे सोपवून मंडळाच्या युवकांनी धार्मिक सलोख्याची अनोखी मिसाल घालून दिली आहे.

आजच्या काळात धर्माच्या नावावर मतभेद निर्माण होत असताना, कडबगाव येथील युवकांनी मात्र एकोप्याला प्राधान्य दिले आहे. 'सण कोणाचाही असो, आनंद आणि सहभाग सर्वांचा!' हा विचार कृतीतून मांडणाऱ्या या निर्णयाचे परिसरातून कौतुक होत आहे. मंडळाच्या इतर पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी उमेश सुतार, सचिवपदी गुरुराज हिरेमठ, कॅशियरपदी सिद्धाराम सुतार व मल्लिनाथ हडपद, कार्याध्यक्षपदी सिद्धारूढ हिरेमठ, खजिनदारपदी ईश्वर व्हसुरे यांची निवड झाली. पुरोहित म्हणून वे. मु. शिवानंद नंदीकोल यांची निवड करण्यात आली.

कार्यकारिणीत दशरथ कापसे, भागण्णा हडपद, जेटप्पा हडपद, मल्लू गुरव, अंबण्णा गुरव, महेश फुलारी, श्रीशैल माळी, मलकप्पा सुतार, विद्यानंद हिरेमठ, आकाश भागानवरे, देविदास सुतार आदींचा समावेश आहे.

## धाराशिव असंघटीत कामगार संघटनेची मागणी; भूमीहीन शेतमजुरांचा बांधकाम कामगार मंडळात समावेश करा




**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये भूमीहीन शेतमजुरांचा समावेश करावा, या मागणीसाठी धाराशिव असंघटीत कामगार संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार कळंब मार्फत निवेदन देण्यात आले.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सुनील बंकट ताटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भूमीहीन शेतमजूर हे असंघटीत कामगार असून यावर्षी भीषण दुष्काळामुळे मोलमजुरी करणाऱ्या अनेक कामगारांच्या हाताला काम नाही. उपासमारीची वेळ आली आहे.

त्यामुळे असंघटीत कामगारांना शासनाच्या योजनांचा लाभ द्यावा, रोजगार उपलब्ध करून द्यावा आणि दुष्काळी पॅकेज म्हणून प्रत्येकी २५ हजार रुपये तात्काळ देण्यात यावेत. घरेलू कामगारांच्या धर्तीवर भूमीहीन शेतमजुरांचाही कामगार कल्याण मंडळात समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर नवनाथ धेले,अश्रुबा धेले, विक्रम भंडारे, सचिन एडके, सुनिल पाटुळे यांच्या स्वाक्षर्या आहेत.

## गुरु निशा प्रभा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जैन श्रावक संघ कळंबच्या वतीने भव्य अन्नदान

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) : जैन धर्मातील थोर साध्वी गुरु निशा प्रभा जी म.सा. यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जैन श्रावक संघ, कळंब यांच्या वतीने मानवता आणि सेवाभावाचा संदेश देत शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळंब येथे भव्य अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासूनच या ठिकाणी भाविकांची व गरजू नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. जैन श्रावक संघाच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हे अन्नदान करण्यात आले.



या सेवाभावी उपक्रमात कळंब शहरातील प्रतिष्ठित उद्योजक संजय देवडा, प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. रोशन कुंकुळोळ, दिलीप लोढा, सुमित बलदोटा, मयूर रुणवाल यांच्यासह सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले शिवाजी गिड्डे, निर्भय घुले, उमेश बोंदर, धनंजय मोरे यांनी विशेष सहभाग नोंदवला.

यावेळी जैन श्रावक संघाच्या कार्यकर्त्यांनी स्वतः उपस्थित राहून अन्नदानाची व्यवस्था पाहिली. गुरु निशा प्रभा यांच्या शिकवणीनुसार जीवदया, करुणा आणि मानवसेवा हाच खरा धर्म असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

जैन श्रावक संघ कळंब हा नेहमीच धार्मिक व सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असतो. गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध धार्मिक, सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविले जाणार असल्याची माहिती यावेळी संघाच्या वतीने देण्यात आली.

या अन्नदान कार्यक्रमाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले असून, जैन श्रावक संघाच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# माझ्या मतदार संघातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या

## केंद्राच्या पथकाच्या टीमचे प्रमुख यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांचे १७ मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मंगळवेढा/प्रतिनिधी

माझ्या मतदार संघातील तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई द्यावी, फळबागांसाठी हेक्टरी किमान १ लाख २५ हजार रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर करावे आणि दुष्काळ अनुदान दिवाळीपूर्वी वितरित करावे, अशा १७ मागण्यांचे निवेदन मंगळवेढा येथे पाहणी दौऱ्यासाठी आलेल्या केंद्र सरकारच्या आंतरमंत्रालयीन पथकाकडे आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

माझ्या मतदार संघातील पावसाअभावी शेती संकटात सापडली असून, अनेक शेतकऱ्यांना पेरणी करता आलेली नाही. उभी पिके, ऊस आणि डाळिंबासह विविध फळबागांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे प्रत्येक शेतजमिनीचा सरसकट पंचनामा करून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

पेरणी न झालेल्या क्षेत्राल-ाही नुकसानभरपाई द्यावी, ई-पीक पाहणीची सक्ती शिथिल करावी आणि सातबारा उतारा, स्वयंघोषणापत्र व प्रत्यक्ष क्षेत्र पडताळणीच्या आध-ारे मदत निश्चित करावी, पिके वाचविण्यासाठी खासगी टँकरवर केलेला खर्च तसेच उत्पन्नातील घट

**फळबागांसाठी हेक्टरी १.२५ लाखांचे पॅकेज, दिवाळीपूर्वी अनुदान देण्याची मागणी**

विचारात घेऊन भरपाई देण्यात यावी.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवून पीककर्जाची पुनर्रचना करावी, कर्जमाफीची अंम लबजावणी करावी आणि जनावरांसाठी चारा डेपो किंवा छावणी तात्काळ चालू करावी तसेच कृषी व घरगुती वीजजोडण्या खंडित करू नयेत.आणि





शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्कात सवलत देण्यात द्यावी,

भोसे व ४० गावे, कासेगाव,आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची थकीत वीजबिले व पाणीपट्टी माफ करून दुष्काळ संपेपर्यंत मोफत वीज व पाणी उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

तालुका स्तरावर स्वतंत्र दुष्काळ निवारण केंद्र स्थापन करावे, रोजग-ार हमीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करून स्थलांतर रोखावे आणि दुर्गम वाड्या-वस्त्यांपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी निवेदनात आहे.

याशिवाय कृष्णा-माण -भीमा नदीजोड प्रकल्पाला प्राधान्य द्यावे, अतिरिक्त पाणी मंगळवेढ्याकडे वळविण्याचा विचार करावा आणि भीमा व माण नदीवरील जुन्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या जागी आधुनिक स्वयंचलित बॅरेज उभारण्यासाठी निधी द्यावा, अस-ेही नमूद करण्यात आले आहे. पाऊस न झाल्यामुळे यावर्षी मंगळवेढा शिवारात जवळपास १५ हजार हेक्टरवर पेरणी होणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी लागणार असून आंधळगाव लेंडवे चिं-चाळे , गोणेवाडी येथील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाऊन पावसाअभावी जळू लागलेल्या पिकांची पाहणी केंद्रातून आलेले केंद्रीय पथकातील आलेल्या अधिकारी व सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारीयांच्या समवेत पाहणी केली..

दिवाळीपूर्वी दुष्काळ अनुद-ानाचे वाटप करून शेतकरी कुटुंबांना दिलासा द्यावा. केंद्राच्या पथकाने १७ मागण्यांचा आपल्या अहव-ालात समावेश करून दुष्काळग्रस्तांना सर्वसमावेशक मदत मिळण्यासाठी शासनाकडे ठोस शिफारशी कराव्यात अशी विनंती आमदार समाधान आ-वताडे यांनी केंद्रीय पथकाकडे केली आहे. यावेळी श्री अफसर खान,सुमित शर्मा,जिल्हा कृषी अधिकारी भोसले साहेब, उप जिल्हाधिकारी अभिजीत पाटील,प्रांताधिकारी माळी सो. तहसीलदार जाधव साहेब तालुका कृषी अधिकारी मिसाळ मॅडम, पो-लीस निरीक्षक बोरिगिड्डे, गटविकास अधिकारी शेख मॅडम, सभापती दिपाली ताड उपसभापती अर्जुन मल्हाळे, उपनगराध्यक्ष भगत सर, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, रमेश भांजे, सौ करुणाताई शिवशरण, पंचायत समिती सदस्य विनायक यादव आदी मान्यवर उपस्थित होते

### ज्ञानयात्री डॉ. रोंगे सर १०० टक्के विजयी होणार

# कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षकांचा स्वेरीच्या डॉ.बी.पी. रोंगे सरांकडे कल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गगनबावडा - राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमांमुळे राज्यात 'ज्ञानयात्री' म्हणून ओळख निर्माण झालेले डॉ. बी. पी. रोंगे सर हे कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत आणि त्यांच्या भेटींना प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. साधारण वर्षभरापासून डॉ. बी.पी. रोंगे सरांनी पुणे विभागात असणाऱ्या पा-चही जिल्ह्यांतील शाळा- महाविद्यालयांना व पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटी देवून तेथील समस्या जाणून घेतल्या. ज्याप्रमाणे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होत आहे त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे भविष्यही उज्वल झाले पाहिजे. डॉ. रोंगे सरांच्या रूपाने पुणे विभागाला अभ्यासू आमदार मिळणार असल्याची भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. यावेळी राज्यातील शिक्षकांनी डॉ. रोंगे सरांना विजयी करण्याचा विडा उचलला आहे, हेच वाढत्या प्रतिसादावरून दिसून येते.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. यनिमित्ताने सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे. प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे.

एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पा-सून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. मागील उमेदवारांनी फारसे काहीही केले नसल्याची भूमिका घेत आता डॉ. रोंगे सरांमुळे शिक्षकांमध्ये उत्साह वाढल्याचे दिसत आहे.

एकुणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वे-री, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्या-तील गगनबावडा तालुक्यातील शाळा-महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी माननीय दत्ताजीराव म ोहिते- पाटील महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तिसंगी, श्री यशवंत म ाध्यमिक विद्यालय असंडोली, माननीय उदयसिंह उर्फ बाळ पाटील माध्यमिक विद्यालय असळज, पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव महाविद्यालय गगनबावडा, श्री संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय शेणवडे यांसह इतर शाळा व म हाविद्यालयांना भेटी देऊन तेथील सम स्या जाणून घेतल्या. या भेटी दरम्यान बोलताना ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी व समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र डॉ. रोंगे सरांना प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आ-हेत, हे मात्र नक्की जाणवते.

### अन्नदान,रुद्राभिषेक आणि महाआरती,अकरा शनिवारचा नेम अन् पिढ्यान् पिढ्यांचा विश्वास

# शनि अमावस्येनिमित्त गौडगावमध्ये श्रद्धेचा त्रिवेणी संगम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

शनि अमावस्येच्या पवित्र पर्वणीवर गौडगाव येथील ऐतिहासिक, हेमाडपंथी आणि दक्षिणमुखी जागृत मारुतीरायाच्या दर्शनासाठी शनिवारी (दि. १०) अथांग भक्तीचा महासागर लोटला. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांतून आलेल्या लक्षा-वधी भाविकांच्या गर्दीने संपूर्ण गौडगावभक्तीमय आणि मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी श्री मारुती अन्नछत्र मंडळात हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दुपारच्या बारा वाजता होणाऱ्या महाआरतीचा मान शिवयोगी पुजारी (रा. पडणुर, ता. इंडी) यांना मिळाला.

**श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन केल्यानंतर गौडगाव येथील श्री जागृत मारुती मंदिराचे दर्शन घेतल्याशिवाय आम्ही कधीही पुढे जात नाही. यामुळे माझे कुटुंब आणि व्यवसाय सुखाचा चालला आहे. मारुतीचे दर्शन घेतल्याने मनाला असीम समाधान मिळते, म्हणूनच मी वारंवार येथे दर्शनासाठी येतो.**
**– मनोज पंडित यमपुरे**
**(रिक्षा चालक, पुणे, महाराष्ट्र)**

**मी नियमितपणे मारुतीरायाच्या दर्शनासाठी येत असतो.संसारातील धावपळीतून मनाला खरी शांती लाभावी, म्हणून मी येथे न चुकता येतो.**
**– बाबुराय मालगती (रा. मंद्रवाड, ता. जेऊरगी, जि. कलबुर्गी,कर्नाटक)**

वर्षातून एकदाच अत्यंत भाग्याने येणाऱ्या या पवित्र योगावर, शनिवारी पहाटे ५ वाजता गौडगावचे मारुती मंदिर परिसर वैदिक मंत्रोच्चार, होमहवनाचा पवित्र सुवास आणि भक्तांच्या आर्त हाकेने दुमदुमून गेला. पार पडलेला रुद्राभिषेक, होमहवन आणि महाआरती म्हणजे जणू ईश्वराशी म ाणसाचे थेट जुळणारे नातेच ठरले. अनेक भाविक शहरांची दगदग आणि संसारातील ताणतणाव विसरून



आदल्या रात्रीच मंदिरात मुक्कामी दाखल झाले होते, तर कित्येकजण पहाटेच्या बोचऱ्या गारठ्यात रांगेत उभे राहून या जागृत मूर्तीचे डोळे भरून दर्शन घेत हो-ते.

सलग ११ शनिवार व मंगळवार म ारुतीचे दर्शन घेतल्याने मनातील प्रत्येक इच्छा पूर्ण होते,हा केवळ समज नसून पिढ्यानपिढ्या जपलेला विश्वासाचा एक अभेद्य धागा आहे. या मंगल प्रसंगी शिवशंभो ब्लड बँक, तालुका मोहोळ यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दूरदूरवरून चालत आणि वाहनांनी आलेल्या प्रत्येक थकलेल्या भक्तासाठी मंदिर समितीच्या वतीने महाप्रस-ादाची भव्य सोय करण्यात आली होती. यावेळी राज्य व परराज्यांतून आलेल्या हजारो मारुती भक्तांनी महाप्रसाद घेऊन तृप्तता अनुभवली.

यावेळी यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे,सचिव सिद्राम वाघम ोडे,प्रकाश मेंथे,फुलारी, चौडप्पा सोलापुरे,बिराप्पा पुजारी,शांतया स्वामी, परमेश्वर सुतार,प्रकाश सनकळ,भारत ननावरे, श्रीशैल कुंभार आमसिद्ध कोरे,श्रीमंत सवळतोट,श्रीमंत म्हेत्रे, मल्लिनाथ मेंत्रे आदींची उपस्थिती होती.

# राज्यस्तरीय जुदो स्पर्धेत नैतिक गोडसे प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील नैतिक बापू गोडसे यांनी राज्यस्तरीय जुदो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. त्याची नॅशनल जुदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



यापूर्वी पै.नैतिक गोडसे यांनी तालुका व जिल्हा पातळीवर यश संपादन केले आहे. त्यांना राहुल गांधी माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य कोडलकर, जय शिवराय कुस्ती संकुलाचे अध्यक्ष अस्लम काझी, ग्रामपंचायत सदस्य पै.बापू गोडसे, पै.तात्या गोडसे, उपसरपंच रामदास नागटिळक यांचे मार्गदर्शन लाभले. कुर्डूवाडी येथील जय शिवराय कुस्ती संकुलन केंद्रामध्ये नैतिक गोडसे सध्या सराव करत आहे. क्रीडा क्षेत्रातील मान्यवर व कौठाळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून तयार झालेल्या

# 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे.

**माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे निर्मित 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' माहितीपटाला आंतरराष्ट्रीय बहुमान**

महाराष्ट्राचे वैभव अस-लेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे.

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

**वारीच्या गौरवशाली परंपरेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूर वारी ही भक्तीम ार्गातील अतिशय प्राचीन परंपरा असून ती जात, धर्म, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते. ही महान परंपरा, तिचे उद्दिष्ट आणि विचार जगभरात पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही सुंदर डॉक्युमेंट्री तयार करून रिलीज करण्यात आली आहे. या डॉक्युमेंट्रीला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६ मध्ये भारत देशासाठीचा 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांचे मी अभिनंदन करतो. वारीची गौरवशाली परंपरा जगासमोर मांडणारी माहितीपट सर्वांनी पाहावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

**वारीची सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित – प्रधान सचिव ब्रिजेश सिंह**

माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह म्हणाले की, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमधून सादर झालेल्या दर्जेदार निर्मितींमधून या माहितीपटाची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली. या बहुमानामुळे महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, संतसाहित्य, सामाजिक समतेचा संदेश आणि वारीची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे.

# केंद्रीय पथकाकडून सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी, शेतकऱ्यांशी संवाद

## बेलाटी ते घेरडीपर्यंत पीक नुकसान, पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा घेतला आढावा; शेतकऱ्यांनी केली वेळेत मदतीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : केंद्र शासनाच्या केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळी, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता तसेच रब्बी हंगामाच्या शक्यतांचा आढावा घेतला. उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी, मंगळवेढा तालुक्यातील विविध गावांमध्ये पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. पावसातील दीर्घ खंडामुळे तूर व अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, काही भागांतील विहिरी आणि साठवण तलाव कोरडे पडल्याचे निदर्शनास आले. चारा व पाण्याच्या टंचाईमुळे पशुपालन व्यवसायावरही गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शासनाकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत वेळेत मिळावी, अशी मागणी केंद्रीय पथकाकडे केली.



केंद्रीय पथकाचे नेतृत्व कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या पीक विभागाचे संचालक डॉ. के. पोनुसामी यांनी केले. पथकामध्ये पेयजल व स्वच्छता विभागाचे टीम लीडर अबसार अहमद खान आणि अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे सहायक संचालक सुमित शर्मा यांचा समावेश होता.

**बेलाटी येथे तूर पिकाचे नुकसान; रब्बी हंगामाचीही चिंता**

केंद्रीय पथकाने उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील शेतकरी सुभाष जाधव यांच्या शेताला भेट देऊन नुकसानग्रस्त पिकाची पाहणी केली. जूनअखेर पेरणी झाल्यानंतर पाऊस न झाल्याने परिसरात पावसाचा सुमारे ३८ दिवसांचा खंड पडला. परिणामी, तूर पीक पूर्णपणे नष्ट झाल्याची माहिती जाधव यांनी पथकाला दिली.

सामान्य परिस्थितीत त्यांच्या शेतातून तुरीचे १० ते १२ टन उत्पादन मिळते; मात्र यंदा उत्पादन मिळण्याची शक्यता नसल्याचे त्यांनी सांगितले. तूर पिकासाठी एकरी सुमारे २१ हजार रुपये खर्च झाला असून, आठ जनावरे असलेल्या त्यांच्या कुटुंबाकडे केवळ महिनाभर पुरेल एवढाच चारा शिल्लक आहे. आता पाऊस झाला तरी हातचे पीक वाचणार नसून, रब्बी हंगामातील पिके घेणेही शक्य होणार नसल्याची व्यथा त्यांनी मांडली.

पथकप्रमुख डॉ. के. पोनुसामी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पीक पद्धती, पावसाची स्थिती, झालेला आर्थिक खर्च आणि आगामी रब्बी हंगामातील नियोजन याबाबत माहिती घेतली.

**मंगळवेढा परिसरातील पीक नुकसान आणि भूजल पातळीची पाहणी**

यानंतर केंद्रीय पथकाने मंगळवेढा शिवारातील शेतीपिकांची पाहणी केली. आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढा मतदारसंघात पाऊस न झाल्यामुळे शेतीपिकांचे झालेले नुकसान आणि निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची माहिती पथकाला दिली.

आंधळगाव येथे पथकाने बंद पडलेल्या हातपंपाची, तसेच मका आणि भुईमूग पिकांची पाहणी केली. गावातील बहुतांश पिकांचे नुकसान झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. येथील विहिरींच्या भूजल पातळीची पाहणी करताना विहिरींनी तळ गाठल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

आंधळगाव शिवारातील दादोसा जतकर यांच्या शेतातील पावसाअभावी करपलेल्या डाळिंब पिकाची तसेच दत्तात्रय जतकर यांच्या शेतातील पाण्याची पातळी संपलेल्या शेततळ्याची पथकाने पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पाणीटंचाईमुळे शेती आणि उत्पन्नावर झालेल्या परिणामांची माहिती घेण्यात आली.

**चारा व पाणीटंचाईमुळे पशुपालन व्यवसाय अडचणीत**

केंद्रीय पथकाने गोणेवाडी येथील गोट फार्मला भेट देऊन दुग्ध व्यवसायाची स्थिती जाणून घेतली. या फार्मच्या पशुपालकाकडे २८ गायी असून, दुष्काळामुळे जनावरांसाठी चारा आणि पाणी मिळविणे कठीण झाल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी दररोज सुमारे १५० लिटर दूध उत्पादन होत होते; मात्र आता ते घटून ८० लिटरवर आले आहे.

चाऱ्याची उपलब्धता कमी झाली असून, चाऱ्याचे दर प्रति टन सुमारे ४ हजार ५०० ते ५ हजार रुपयांपर्यंत वाढल्याची माहिती त्यांनी दिली. जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळविण्यातही अडचणी येत आहेत. ही परिस्थिती अशीच राहिल्यास पुढील दोन महिन्यांत पाणीटंचाईमुळे गावातील नागरिकांना स्थलांतर करावे लागू शकते, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

यानंतर पथकाने गोणेवाडी गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या सार्वजनिक विहिरीची पाहणी केली. विहिरीतील भूजल पातळी अत्यंत खालावल्याने गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी पथकाला दिली.

**पाच वर्षांत प्रथमच वाणीचिंचोळीचा साठवण तलाव कोरडा**

केंद्रीय पथकाने वाणीचिंचोळी येथील साठवण तलावाची पाहणी केली. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी हा तलाव गेल्या पाच वर्षांत प्रथमच पूर्णपणे कोरडा पडल्याची माहिती दिली. पावसाअभावी जलसाठे आटल्याने परिसरातील पाणी उपलब्धतेवर गंभीर परिणाम झाल्याचे यावेळी स्पष्ट झाले.



त्यानंतर पथकाने वाकी-घेरडी परिसरातील फळबागा, वांगी आणि ऊस पिकांची पाहणी केली. दुष्काळामुळे पिकांची झालेली दयनीय अवस्था शेतकऱ्यांनी पथकाच्या निदर्शनास आणून दिली. पाणीटंचाई आणि पावसाच्या अभावामुळे शेती उत्पादनावर मोठा परिणाम झाला असून, आगामी हंगामाबाबतही शेतकऱ्यांमध्ये चिंता असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वेळेत मदत देण्याची मागणी**

केंद्रीय पथकाच्या पाहणीदरम्यान विविध गावांतील शेतकऱ्यांनी पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी चारा व पाण्याची कमतरता आणि घटलेले उत्पन्न याबाबत आपली परिस्थिती मांडली. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, रब्बी हंगामही हातचा जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत द्यावी आणि ती वेळेत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान संबंधित गावांतील तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी पीक परिस्थिती, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती याबाबत केंद्रीय पथकाला माहिती दिली.

**उपस्थिती**

या पाहणी दौऱ्यावेळी राज्याचे कृषी आयुक्त सुरेश मांढरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे, कृषी सहसंचालक सुभाष काटकर, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ लालासाहेब तांबडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज माने, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, मंगळवेढ्याचे उपविभागीय अधिकारी अमित माळी, मंगळवेढ्याचे तहसीलदार मदन यादव, सांगोल्याच्या तहसीलदार बाळूबाई भागवत, संबंधित तालुका कृषी अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

---

### ११ व १२ ऑक्टोबर रोजी विरक्तमठात विविध धार्मिक कार्यक्रम

# दुधनीत श्री शांतलिंगेश्वर महास्वामीजींच्या ६८ व्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/निंगप्पा निंबाळ

दुधनी येथील श्री शांतलिंगेश्वर विरक्तमठात लिं. श्री म.नि.प्र. गुरुशांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या ६८ व्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, दि. ११ आणि सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात षटस्थल ध्वजारोहण, धर्मचिंतन, डोलिन गायन, गुरुवंदन, अड्डपल्लखी जंगमोत्सव, महागणाराधना, शिवानुभव गोष्टी आणि भव्य दीपोत्सव आदी कार्यक्रम होणार आहेत.

**पालखी सोहळा, आध्यात्मिक प्रवचन, डोलिन गायन आणि दीपोत्सवाचे आकर्षण**





पहिल्या दिवशी ध्वजारोहण व डोलिन गायन

रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता परमपूज्य श्री म.नि.प्र. डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते षटस्थल ध्वजारोहण होणार आहे. रात्री ८ वाजता धर्मचिंतन गोष्टींचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ९ वाजता प्रसिद्ध कलाकारांच्या सहभागातून डोलिन पदांचा विशेष जागरण कार्यक्रम रंगणार आहे.

या कार्यक्रमात हिरेबेवनूर (ता. इंडी, जि. विजापूर) येथील श्री बीरदेवर गायन संघ आणि कुरघाट (ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) येथील श्री अमोघसिद्धेश्वर डोलिन गायन संघ सहभागी होणार आहेत. मुख्य गायक नसरीन कुरगोठ, साहित्य सरदार गुरुलिंग मास्टर संकनाळ आणि संवादासाठी सोमु मास्टर कोटनाळ यांचा सहभाग असणार आहे.

दुसऱ्या दिवशी पालखी सोहळा, महाप्रसाद व दीपोत्सव

सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता परमपूज्य श्री म.नि.प्र. शिवबसवरेंद्र महास्वामीजी यांचे गुरुवंदन समर्पण होणार असून, भव्य वाद्यांच्या गजरात अड्डपल्लखी जंगमोत्सव अर्थात पालखी सोहळा पार पडणार आहे. सकाळी ११ वाजता महागणाराधना व महाप्रसाद वितरण होईल. दुपारी २.३० वाजता ज्ञान दासोहाचे शिवानुभव गोष्टी अर्थात आध्यात्मिक प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता भक्तिमय वातावरणात भव्य दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

श्री शांतलिंगेश्वर विरक्तमठाच्या वतीने दुधनी शहरासह परिसरातील सर्व भाविक भक्तांना सपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पवित्र पुण्यतिथी सोहळ्यात सहभागी होऊन धार्मिक कार्यक्रमांचा, आध्यात्मिक विचारांचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मठाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

### नंगपुरामुर्री निवासी शाळेचा उपक्रम : भाषा विकासाचा घेतला ध्यास

# विद्यार्थ्यांनी सूत्रांची व अलंकारांची तयार केली भिंत...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी भाषा विकास साधण्यासाठी अलंकारांची भिंत व गणिताचे सुत्रे तयार करण्यात आली.



सदर शाळेतील मराठी भाषा शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या मार्गदर्शनाखाली वाचन कट्टा आणि लेखन कट्टा तयार करून दररोज वर्गात सकाळी ९ वाजता सुरुवात केली जाते. या प्रयोगाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष अनुवर्तनीय करण्यासाठी वर्गातच मराठी भाषा विकास व संवर्धन होण्यासाठी अलंकार, वृत्त, रस आदी व्याकरणाची भींत तयार केली.

तसेच गणित व विज्ञान विषयाचा अभ्यासक्रम सोपे करण्यासाठी सूत्रांची भींत एका कोपऱ्यात तयार करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडत आहे. अभ्यास सहज व सोप्या भाषेत करता येईल. हा त्यामागचा उद्देश बाळगला.

वाचन कट्टा व लेखन कट्टा या प्रकाराने विद्यार्थ्यांमध्ये काही प्रमाणात वाचनाची गोडी लागलेली आहे असे निदर्शनास येत आहे. या उपक्रमाला सहकार्य करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांचा नेहमी मोलाचा वाटा असून शाळेतील शिक्षक नीता भलमे पुष्करराज लांजेवार साधना पारधी आशिष शहारे प्रदीप ढवळे कार्तिक शहारे दीक्षा तुरकर निशा गभणे यांचाही हातभार लागला आहे.

---

**ऊस दर जाहीर न करताच ऊसतोड सुरू केल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक!**

**माढा-पंढरपूर तालुक्यात ऊस वाहतूक रोखली; भीमानगर येथे बारामती ॲग्रो कारखान्याच्या कार्यालयाला ठोकले टाळे**

# सोलापूर जिल्ह्यात ऊस दराचे आंदोलन पेटणार; ऊसतोड बंद करून वाहतूक करणारी वाहने रोखली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भीमानगर, प्रतिनिधी : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चालू हंगामातील उसाचा दर जाहीर न करताच साखर कारखान्यांकडून ऊसतोड सुरू करण्यात आल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. माढा आणि पंढरपूर तालुक्यांत संघटनेच्या कार्यकर्त्यांनी ऊस वाहतूक रोखून धरली. तसेच भीमानगर येथे रोहित पवार यांच्या बारामती ग्रो कारखान्याच्या कार्यालयाला टाळे ठोकून ऊस दर जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.

एकीकडे ऊस उत्पादक शेतकरी उत्पादन खर्चाच्या वाढत्या ओझ्याखाली दबला असताना दुसरीकडे कारखानदारांनी उसाचा दर जाहीर न करताच ऊसतोड सुरू केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. एकदा शेतातील ऊस कारखान्यात गेल्यानंतर कारखानदार ठरवतील तो दर स्वीकारण्याची वेळ शेतकऱ्यांवर येऊ नये, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे.

ऊस दर जाहीर करा, अन्यथा ऊसतोड करू देणार नाही!

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता आणि उसाचा दर स्पष्ट न करता कारखाने सुरू करणे अन्यायकारक आहे. त्यामुळे ऊसाचा योग्य दर जाहीर झाल्याशिवाय ऊसतोड आणि ऊस वाहतूक सुरू करू देणार नाही, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे. याच भूमिकेतून माढा-पंढरपूर तालुक्यांत ऊस वाहतूक करणारी वाहने रोखण्यात आली, तर भीमानगर येथे बारामती ग्रो कारखान्याच्या कार्यालयाला टाळे ठोकण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात ऊस दराचा संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळावा, उत्पादन खर्चाची भरपाई होऊन शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे शिल्लक राहावेत, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना संघर्षाच्या मैदानात उतरली आहे. कारखानदारांनी तातडीने ऊस दर जाहीर करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा सोलापूर जिल्ह्यात ऊस दराचे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या या आंदोलनातून देण्यात आला आहे.

दर जाहीर झाल्याशिवाय ऊसतोड नाही; शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव मिळाल्याशिवाय माघार नाही! हा निर्धार व्यक्त करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊस दराच्या लढ्याला सुरुवात केली आहे. आगामी काळात या आंदोलनाची धग संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात पोहोचण्याची शक्यता आहे.

